m4मराठी.com

## मंगलाष्टक श्लोक

स्वस्ति श्री गणनायकम् गजमुखम् मोरेश्वरम्  सिद्धिदम्

बल्लाळो मुरूडम् विनायक मढम् चिंतामणी: थेउरम्

लेण्याद्री गिरीजात्मजम् सुवरदम् विघ्नेश्वरम् ओझरम्

ग्रामे रांजन संस्थितो विजयताम् कुर्यात सदा  मंगलम

गंगा सिंधु सरस्वतीच यमुना गोदावरी नर्मदा

कावेरी शरयु महेंद्र तनया चर्मण्वती वेदिका

क्षिप्रा वेत्रवती महा सुरनदी ख्याता जया गंडकी

पुर्णा पुर्ण जलै: समुद्र सहिता कुर्वंतु वो मंगलम्

यावत वीचीतरंगात वहति सुरनदि जान्हवि पुण्यतोया यावत आकाशमार्गे तपति दिनकरो भास्करो लोकपाल:

यावत वज्रेंद्रनिल: स्फटिकमणिशिला वर्तते मेरूश्रुंगे तावत शंभोप्रसादात स्वजनपरिवृतो जिविताम दम्पति वै

लक्ष्मी कौस्तुभ पारिजातक सुरा धन्वंतरीश्चन्द्रमा

गाव: कामदुधा सुरेश्वर गजो रंभादी देवांगना

अश्व: सप्तमुखो विषम् हरीधनु: शंखोमृतम चांबुधे

रत्नानिह चतुर्दश प्रतिदिनम कुर्वंतु वो मंगलम

रामो राजमणी: सदा विजयते रामम् रमेशम् भजे रामेणाभिहता निशाचरचमु

रामाय तस्मै नम:

रामान्नस्ति परायणम् परतरम् रामस्य दासोस्म्यहम्

रामे चित्तलय: सदा भवतु मे भो राम मामुद्धर

कुर्यात  सदा  मंगलम्  शुभ  मंगल  सावधान

कस्तुरी तिलकम् ललाट पटले वक्षस्थले कौस्तुभम्

नासाग्रे नवमौक्तिकम् कर तले वेणु: करे कंकणम्

सर्वांगे हरी चंदनम् सुललितम् कंठेच मुक्तावली गोप:स्त्रिपरिवेष्टितो विजयताम् गोपाल

चुडामणी

कुर्यात सदा मंगलम् शुभ मंगल सावधान

मत्स्य कुर्म वराह अन नरहरी हे चार झाले कृती
त्रेती वामन परशुराम मग तो श्रीराम सितापती
ऐसे हे अवतार सात हरी तो द्वापारीचा आठवा
जाणावा कलीमाजी बौद्ध नववा कल्की पुढे दहावा
कुर्यात सदा मंगलम् शुभ मंगल सावधान

आदौ राम तपोवनाधिगमनं हत्वा मृगं कांचनं वैदेहीहरणं जटायुमरणं सुग्रीवसंभाषणं वालीनिर्दलनं

समुद्रतरणं लंकापुरीदाहनम पश्चाद्रावणकुंभकर्णहननं एतद्धि रामायणमं

आदौ देवकीदेवगर्भजननं गोपिगृहे वर्धनम् मायापूतनजीवितापहरणं गोवर्धनोद्धारणम्

कंसच्छेदनकौरवादिहननं कौन्तेयसंरक्षणम् एतद्भागवतं पुराणकथितं श्रीकृष्णलीलामृतम

द्वैताभ्यास नको उगे पढु नको दुष्टासि वंदू नको शास्त्राभ्यास रखो श्रुती चुकुं नको, तीर्थासि निंदू नको काळाचे

भय मानसी धरू नको, ढोंगास भूलू नको ज्याचीया स्मरणे पतीत तरले, तो शंभु सोडू नको

कौमारी कमलात्मजा कमलजा कामेश्वरी कालिका काली कौमुदि कालरात्रि कमला कात्यनी कौलिका कल्याणी

कलिकल्मषापहरिणी कारुण्यकल्लोलिनी कामाक्षी करवीरवासिनि सदा कुर्वंतु वो मंगलम्

योग्यामाजि शिरोमणीच अथवा जो पार्वतीचा पती जो कैलासि करीत वासहि सदा गंगा जयाची सती भाळी चंद्र

तसेच नाग शरिरी ज्याच्या रहाती सदा तो शंभू त्रिपुरारि या वधुवरा रक्षो सदा सव
माला मंगल अर्पिल्या, तनुमने हे ऐक्य होवो खरे अन्योन्यास अता खरीच समता, द्या साथ एकस्वरे कौटुंबी कुळि

राष्ट्रकार्यि कसुनी, लावा पणा अल्पता कर्तव्यासचि जागता नर–जिणे, हो सार्थ हे तत्वता

हेरंबा, गणनायका गजमुखा सिद्धीश्वरा मोरया चित्ती वास विनायका तव असो भक्तास दावी दया दाना अन्य न

मागतो, शुभ तुझे सन्नाम राहो मुखी

न द्रोहास करो कुणी जगति या, धी राहुंदे सन्मुखी

या कुन्देंदुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता

या वीणावरदंडमंडितकरा या श्वेतपद्मासना

या ब्रम्हाच्युतशंकरप्रभृतिभि: देवै: सदा वंदिता

सा मां पातु सरस्वती भगवती नि:शेष जाड्या पहा

गंगा सिंधु सरस्वती च यमुना गोदावरी नर्मदा कावेरी शरयू महेन्द्रतनया चर्मण्वती वेदिका क्षिप्रा वेत्रवती

महासुरनदी ख्याता च या गंडकी पूर्णा: पूतजलै: समुद्रसहिता: कुर्वन्तु वो मंगलम्

काशी कांचि अवंतिका मधुपुरी माया अयोध्या बरी श्रीमद् द्वारवती सुपुण्यजननी विख्यात पृथ्वीवरी क्षेत्रे धर्म

परायणे अनुपमे जी भारती वर्णिली सौमंगल्य करोनिया वधुवरां कुर्वन्तु वो मंगलम

औदार्ये इतरां तिघांस जगती जो जाहला आश्रय दावी देऊनि धैर्य अन्न मनुजां सन्मार्ग तो अक्षय जो राजा

जनकादिकां जनहिती सद्बुद्धि दे निश्चल गार्हस्थ्याश्रम तो तुम्हां वधुवरां देवो सदा मंगलम

लाभो संतती संपदा बहु तुम्हा लाभोतही सद्गुण साधोनी स्थिर कर्मयोग अपुल्या व्हा बांधवां भूषण सारे

राष्ट्रधुरीण हेचि कथिती कीर्ती करा उज्ज्वल गार्हस्थ्याश्रम हा तुम्हा वधुवरां देवो सदा मंगलम्

मोठे दोंद कटी फणींद्र बरवा भाळी शशी शोभतो हस्ती अंकुश लड्डु पद्म परशू दंती हिरा झळकतो पायी पैंजण घाघरी रुणझुणी प्रेमे बरा नाचतो

ऐसा देव गणेश तो वधुवरां कुर्यात् सदा

शास्त्री आश्रम चार जे कथियले त्यांमाजि जो उत्तम देतो स्वार्थ परार्थ जोडुनि नरा ऐसा गृहस्थाश्रम झाली बद्ध

तया विवाहविधिने स्वीकारूनी सौख्यदा

मांगल्यप्रद 'सावधान' ध्वनि त्यां कुर्यात सदा मंगलम्

कस्तूरीतिलकं ललाटपटले वक्ष:स्थले कौस्तुभं नासाग्रे नवमौक्तिकं करतले वेणु: करे कंकणम् सर्वांगे हरिचंदनं सुललितं कण्ठे च मुक्तावली गोपस्त्रीपरिवेष्ठितो विजयते कुर्यात सदा मंगलम

कंठे यस्य विराजते हि गरलं शीर्षे च मन्दाकिनी वामांके गिरिजासनं कटितटे शार्दूलचर्माम्बरम् माया यस्य रुणद्धि विश्वमखिलं तस्मै नम: शंभवे
स स्थाणु: स्थिरभक्तियोगसुलभ: कुर्यात् सदा मंगलम

अग्नी, ब्राम्हण, आप्त, मित्र, अवघ्या आवाहिता देवता आनंदे नवदंपतीस बघती, अन् वर्षती अक्षता आशीर्वाद म्ह्णून तांदूळ धरा हे आपुल्या मस्तकी मागा हेच पुन: पुन: वरवधू, कुर्यात सदा मंगलम्

तेज:पुंज दिसे प्रवालगिरिसा, रक्तांबरा नेसला देवांचा अधिदेव तो गणपती या मंडपी बैसला पूजा मान्य करा, प्रसन्न वदने स्वीकारिली वंदना
आता एकच मागणे गजमुखा 'कुर्यात सदा मंगलम्'

अंबा अष्टभुजा त्रिलोकजननी देवी कुलस्वामिनी आली लग्नघरा निवास करण्या आवाहना ऐकुनी आता तीच उभी मुठीत मिटल्या घेऊनीया अक्षता माते, हो वरदायिनी वधुवरा, 'कुर्यात् सदा मंगलम्'

आता सावध सावधान घटिका संपूर्ण आली भरू ऽ
भावे सद्गुरूते स्मरा गलबला कोण्ही नका हो करू ऽऽ चिंतावे कुलदेवतेसि हृदयी एकाग्रचित्ते बसा ऽ
वेदीच्या कलशासि सादर असा कुर्यात् सदा मंगलम् ऽऽ

श्रीवत्सांकित भूषणे तुलसिची आपाद माला रूळे ऽ माथां रत्नकिरीट कौस्तुभ गळां सूर्यप्रभे ना तुळे ऽऽ केयूरांगदकुंडले सुरशना हस्तांबुजी आयुधे ऽ लक्ष्मीयुक्त मुरारि तो वधुवरां कुर्यात सदा मंगलम् ऽऽ

प्रारंभीं गणनायकासि नमन साष्टांग भावे किजे ऽ शेंदूरे डवरोनि सोंड बरवी दूर्वांकुराचे तुरे ऽऽ माझे चित्त विरे मनोरथ पुरे देखोनि चिंता हरे ऽ गोसावीसुत वासुदेव कवि रे त्या मोरयाला स्मरे

नेत्री दोन हीरे प्रकाश पसरे अत्यंत ते साजरे माथा शेंदूर पाझरे वरी बरे दुर्वांकुरांचे तुरे माझे चित्त

m4मराठी.com

विरे मनोरथ पुरे देखोनी चिंता हरे

गोसावीसुत वासुदेव कवी रे त्या मोरयाला स्मरे
कैलासी वसतो सदैव पहातां नंदिवरी आरूढ वामांकी गिरिजा सभाग्य सरिता जीची शिवा आवड भावार्थे नमितां

कृपा करि बहू रक्षी दीनांकारण

तो स्वामी गिरिजापती, नमन त्या घालोनी लोटांगण

लेणी सुंदर दिव्य घालुनि शिरी वेणी भुजंगापरी पुष्पांते रमणीय गुंफुन झणी घाली मृगाक्षी वरी शोभे केशकलाप

तो परिमळे भाळी टिळा कस्तुरी कैसे कुंकुम रेखिले जणु नभी नक्षत्र की सुंदरी

तदेव लग्नं सुदिनं तदैव ताराबलं चंद्रबलं तदैव विद्याबलं दैवबलं तदैव लक्ष्मीपते

तेऽन्घ्रियुगं स्मरामि शुभमंगल सावधान!